## लोकसभा निवडणूक - २००९

# शिवसेनेचा वचननामा

१. दहशतवाद्यांचा बंदोबस्त

२. शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा

३. महाराष्ट्रात भारनियमन पूर्णपणे रद्द झालेच पाहिजे

४. केंद्राकडून मिळणाऱ्या निधीचे न्याय्य वाटप

५. स्थानिकांना नोकऱ्या

६. देशाची मोठी संपत्ती : शेतकरी आणि कामगार

७. बेळगांव-कारवार सीमाप्रदेश केंद्रशासित झालाच पाहिजे

८. उद्ध्वस्त गिरणी कामगार-कर्मचाऱ्यांना निवारा मिळून त्यांचे संपूर्ण पुनर्वसन झालेच पाहिजे.

९. न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा डोंगर

१०. महागाईवर नियंत्रण आलेच पाहिजे

११. इतर महत्त्वाचे प्रश्न

## <u>लोकसभा निवडणूक - २००९</u>

# शिवसेनेचा वचननामा

इ.स. १९८९ पासून शिवसेनेने लोकसभेच्या सहा निवडणुकांमध्ये भाग घेतला. या सहाही निवडणुकांमध्ये शिवसेना भाजपची युती होती. प्रत्येक वेळी युतीला पुढीलप्रमाणे जागा मिळाल्या.

| | वर्ष | शिवसेना | भाजपा | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | १९८९ | ४ | १० | १४ |
| २. | १९९१ | ६ | ४ | १० |
| ३. | १९९६ | १५ | १७ | ३२ |
| ४. | १९९८ | ६ | ४ | १० |
| ५. | १९९९ | १५ | १४ | २९ |
| ६. | २००४ | १२ | १३ | २५ |

महाराष्ट्रातून निवडून आलेल्या शिवसेनेच्या खासदारांनी लोकसभेमध्ये लक्षणीय काम केले. सर्वात महत्वाचा फायदा असा झाला की शिवसेनेचे खासदार सभागृहात असल्यामुळे शिवसेनेवर होणाऱ्या बेछूट, निराधार टीकेला पायबंद बसला. दुसरा फायदा म्हणजे मराठी माणसांचे प्रश्न मांडण्यात शिवसेनेचे खासदार अग्रेसर राहिले आणि तिसरी गोष्ट म्हणजे हिंदुत्वाचा खणखणीत आवाज लोकसभेत दुमदुमला.

शिवसेनेच्या खासदारांनी महाराष्ट्राच्या प्रत्येक प्रश्नात आत्मियतेने लक्ष दिले आणि महाराष्ट्राची शान वाढवली. महाराष्ट्राचा विचार करताना अर्थातच या खासदारांनी देशहिताकडे कधीच दुर्लक्ष केले नाही.

शिवसेनेच्या खासदारांच्या कार्यक्षमतेमुळे त्यांना प्रत्येक वेळी मा.श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात काम करण्याची संधी मिळाली. शिवसेनेचे नेते श्री. मनोहर जोशी यांच्यासह श्री. सुरेश प्रभू, श्री. अनंत गीते, श्री. आनंदराव अडसूळ, श्री. बाळासाहेब विखे पाटील यांसारखे खासदार मंत्री झाले. त्यांनी सक्षम कारभार केला. एवढेच नव्हे तर लोकसभेचे सर्वोच्च स्थान म्हणजे अध्यक्षपद ते सुध्दा शिवसेनेला मिळाले. देशातील सर्व नद्या जोडून पाण्याचा महत्वाचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी शिवसेनेच्या खासदारावर सोपविण्यात आली. शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींच्या कामामुळे शिवसेनेकडे पाहण्याचा इतर राज्यांचा दृष्टीकोनच बदलला.

आज पुन्हा एकदा शिवसेना आणि भाजपच्या खासदारांना लोकसभेत अधिक चांगल्या संख्येने मतदारांनी निवडून आणावे अशी विनंती करण्यासाठी आणि निवडून

आल्यानंतर आमचे खासदार आपणासाठी काय करणार हे सांगण्यासाठी हा लोकसभा २००९ चा ''**वचननामा**'' !

## वचननामा

### १. दहशतवाद्यांचा बंदोबस्त

इ.स. १९९२-९३ पासूनच दहशतवाद्यांनी हिंदुस्थानात हाहाःकार माजविला आहे. मुंबईत १३ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले आणि ९०० माणसे मृत्युमुखी पडली. हजारो माणसे जखमी झाली. हिंदु मुसलमानांमध्ये प्रचंड दंगल झाली आणि निरपराध माणसे ठार झाली. तेव्हापासून देशाच्या वेगवेगळ्या भागात पुढील दहशतवादी कारवाया झाल्या.

### निरनिराळ्या ठिकाणी झालेले बॉम्बस्फोट

१. मुंबई - ११ जुलै २००६
(रेल्वेमध्ये ७ स्फोट- १८७ ठार, ७०० हून अधिक जखमी)

२. हैद्राबाद - २५ ऑगस्ट २००७
(४२ ठार- ५४ जखमी)

३. जयपूर - १३ मे २००८
(८ स्फोट, ६५ ठार व २१६ जखमी)

४. बंगळूर - २५ जुलै २००८
(९ स्फोट, २ ठार १७ जखमी)

५. अहमदाबाद - २६ जुलै २००८
(१७ स्फोट, ५६ ठार, २०० जखमी)

६. दिल्ली - १३ सप्टेंबर २००८
(५ स्फोट, २५ ठार, १२५ जखमी)

याचा अर्थ असा की आता देशात सुरक्षिततेची हमी राहिली नाही. २६.११.२००८ मध्ये १० अतिरेक्यांनी ताज, नरिमन हाऊस, ओबेरॉय, छत्रपती शिवाजी टर्मिनस या चार ठिकाणी हैदोस घातला. दोन दिवसांत २०० लोक ठार केले आणि ३५० लोकांना जखमी केले. केवळ मुंबईच नव्हे तर सारा देश हादरुन टाकला. या आतंकवादी हल्ल्याचा आणि बॉम्बस्फोटाचा सूड घेण्याची संधी भारतवासियांना साधावी लागेल. शिवसेना भाजपचे नवीन येणारे सरकार पार्लमेंट

उडविण्याचा कट करणाऱ्या अफजल गुरु याला ताबडतोब फाशी देईल आणि कोणत्याही आतंकवाद्याला क्षमा करणार नाही. 'पोटा'सारखा कडक कायदा पुन्हा आणला पाहिजे व बांगलादेशी घुसखोरांना कायमचा प्रतिबंध केला पाहिजे. शिवसेनेचे खासदार यासाठी आग्रही राहातील.

सर्व भारतीय नागरिकांना 'बहुउद्देशिय' ओळखपत्र देण्याचा कार्यक्रम राबविण्यास केंद्राला भाग पाडू.

## २. <u>शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा झालाच पाहिजे</u>

गेल्या काही वर्षात कर्ज फेडू न शकणाऱ्या शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या हा काँग्रेस सरकारला कलंक आहे. सर्वात जास्त आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. शिवसेनेने केलेल्या तीव्र आंदोलनामुळे पंतप्रधानाना आणि काँग्रेसप्रणित सरकारला कर्जमाफीची घोषणा करावी लागली. वेगवेगळी पॅकेजेस जाहीर करावी लागली. या पॅकेजेसचा फायदा ठराविक शेतकऱ्यांना मिळाला परंतु पॅकेजेसमध्ये असलेल्या दोषांमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालूच राहिल्या. म्हणूनच आम्ही असे अभिवचन देत आहोत की शिवसेना भाजपचे सरकार सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांचा ७/१२ पूर्णपणे कोरा करु.

### <u>शेतकऱ्यांना सर्वोच्च सन्मान</u>

भारतरत्न, पद्मभूषण, पद्मश्री असे सर्वोच्च किताब विविध क्षेत्रातील व्यक्तिंना दिले जातात. शेतकरी हा देशाचा अन्नदाता व पाठीचा कणा असून कुणाही शेतकऱ्याला असा सर्वोच्च सन्मान दिला जात नाही. शिवसेनेचे खासदार यासाठी आवाज उठवितील.

## ३. <u>महाराष्ट्रांत भारनियमन पूर्णपणे रद्द</u>

संपूर्ण हिंदुस्थानात ठिकठिकाणी विजेचे भारनियमन आहे. महाराष्ट्रात तर कहरच झाला आहे. दिवसांत दहा तास / बारा तास तर काही ठिकाणी १४ तासांचे भारनियमन चालू आहे. काँग्रसने ग्रामीण भागाला आणि काही शहरांमध्ये सुध्दा लोकांना काळोखात ढकलले आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांचा रात्रीचा अभ्यास बंद झाला आहे. तर ज्या विजेच्या पंपाच्या आधारे शेतीला पाणी पुरवायचे ते वीज पंपच बंद पडले आहेत. अंधारामुळे शहरांतून गुन्हेगारी वाढत आहे.

या सर्वांचे कारण म्हणजे महाराष्ट्रात गेल्या १० वर्षात १ मेगावॅट सुध्दा विजेची निर्मिती वाढलेली नाही. फार मोठ्या प्रमाणात विजेची चोरी होत आहे. खरे सांगायचे तर वीज खात्यात नुसती बेबंदशाही माजली आहे. महाराष्ट्रातील वीज भारनियमन रद्द करण्यासाठी केंद्र सरकारला भाग पाडू.

## ४. केंद्राकडून मिळणाऱ्या निधीचे योग्य वाटप

केंद्र सरकारचे निधी वाटप करण्याचे धोरण बदलण्याची आवश्यकता आहे. लोकसंख्या जास्त त्या राज्याला केंद्राने जास्त निधी पुरविणे हे सुध्दा चुकीचे आहे. एखाद्या राज्याने कष्टाने उत्पादन वाढविले तर त्या राज्याला वाढीव उत्पादनाप्रमाणे केंद्रीय निधी मिळाला पाहिजे. प्रादेशिक पक्षांची निर्मिती होण्यास केंद्रीय निधी पुरविण्याची केंद्र सरकारची चुकीची धोरणे हे सुध्दा एक कारण आहे. एखाद्या राज्यावर इतर राज्यातील जनतेचे लोंढे आदळत असतील तर त्या लोंढ्यांसाठी होणारा खर्च केंद्राने दिला पाहिजे. एखादे राज्य लोकसंख्या नियंत्रित करीत नसेल तर त्या राज्याला मिळणारा केंद्रिय निधी मर्यादीत ठेवला पाहिजे. शिस्तबध्द कामाचे कौतुक आणि बेशिस्त, बेदरकार वागणूक व राज्याचा बिघाड करणाऱ्यांना वेसण घालणे हे केंद्र सरकारचे धोरण असलेच पाहिजे. एकटी मुंबई केंद्र सरकारला विविध करांच्या रुपाने दरवर्षी १ लाख कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवून देते. यापैकी दरवर्षी २५ टक्के निधी मुंबई व महाराष्ट्राच्या विकासासाठी मिळालाच पाहिजे. शिवसेनेचे खासदार या दृष्टीने प्रयत्न करतील.

## ५. स्थानिकांना नोकऱ्या

महाराष्ट्रात मराठी लोकांना ८० टक्के नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत ही शिवसेनेने सुरुवातीपासूनच घेतलेली भूमिका आहे. सुदैवाने ही भूमिका महाराष्ट्र सरकारने सुध्दा स्विकारली आहे. परंतु अजूनही या भूमिकेचे कायद्यात रुपांतर झालेले नाही म्हणून महाराष्ट्रात - विशेषतः मुंबईत परप्रांतातून अन्य भाषिक येतात आणि स्थानिकांच्या नोकऱ्यांवर अतिक्रमण करतात. इ.स. १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना करतानाच या मुद्याचा सखोल विचार झाला नाही म्हणूनच महाराष्ट्राप्रमाणे अन्य काही राज्यांमध्येसुध्दा या विषयावर असंतोष आहे. शिवसेना-भाजपचे सरकार आल्यानंतर शिवसेना या प्रश्नाचा आग्रह सरकारकडे करेल आणि प्रत्येक राज्यातील भूमिपुत्रांच्या हितामध्ये लक्ष घालण्याची विनंती केंद्र सरकारला करील, यामुळे प्रादेशिक अस्मितेचे हितसंबंध सांभाळले जातील. सर्व प्रदेशांचा विकास जोराने होईल आणि राज्यांचा विकास म्हणजे अंतिमतः देशाचा विकास ही भूमिका स्वीकारली जाईल.

## ६. देशाची मोठी संपत्ती : शेतकरी आणि कामगार

शेतकऱ्याला देशाचा राजा असे म्हटले जाते परंतु प्रत्यक्षात मात्र आजचा शेतकरी राजा नसून भिकारीच झाला आहे. काँग्रेसच्या सरकारने शेतकऱ्यांचा उपयोग फक्त निवडणुकीपुरता केला आहे. देशातील फार मोठे उत्पन्न शेतकऱ्यांपासून मिळते परंतु शेतकऱ्यांवर अतिशय कमी खर्च केला जातो - म्हणूनच गतवर्षी देशातील शेतकऱ्यांनी

अधिकाधिक आत्महत्या केल्या. कर्जाची परतफेड सुध्दा शेतकरी करु शकत नाही. शेती उत्पादनाला केलेला खर्च वसूल होण्याइतकाही भाव मिळत नाही. सरकारने शेतकऱ्यासाठी अशी 'इरमा' योजना राबवावी की प्रत्येक शेतकऱ्याला नैसर्गिक किंवा अन्य आपत्तीमुळे अथवा अन्य कारणाने त्याचे होणारे नुकसान भरुन मिळाले पाहिजे.

जसा प्रश्न शेतकऱ्यांचा तसाच प्रश्न कामगारांचाही आहे - आपल्या देशात कोट्यावधी कामगार असुरक्षित आहेत. छोटे-मोठे कारखाने बंद पडत आहेत. महाभयानक मंदीची झळ कामगारांना सर्वात जास्त पोहचत आहे. कामगारांच्या घरी चूल पेटणे कठीण झाले आहे. काँग्रेस सरकार कामगारांच्या बेकारीकडे लक्ष द्यायला तयार नाही. म्हणून संघटीत व असंघटीत सर्व कामगारांना न्याय देण्याची भूमिका शिवसेनेने घेतली आहे. कामगारांच्या उपजीविकेची व्यवस्था पाहून त्यांना छोटा-मोठा रोजगार देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

कांदा पिकाकरीता किमान आधारभूत किंमत जाहीर करणे; ऊस, कापूस, संत्रा, सोयाबिन, धान (तांदूळ) व अन्य पिकांकरिता उत्पादन खर्चावर आधारीत किंमतींचा आग्रह धरणे यासाठी आमचे खासदार प्रयत्नशील राहतील.

## ७. बेळगांव - कारवार सीमाप्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार

इ.स. १९६० मध्ये मुंबईसह महाराष्ट्र मुक्त झाला. मराठी भाषिकांचे राज्य झाले. परंतु हे राज्य होत असतानाच बेळगांव - कारवार व राज्याच्या सीमाभागाला महाराष्ट्रापासून तोडून कर्नाटकात टाकण्यात आले. या विषयावर सीमाभागातील जनता गेली ५० वर्षे महाराष्ट्रात येण्यासाठी उत्सूक आहे. हा सीमाभाग महाराष्ट्रात यावा म्हणून महाराष्ट्राच्या विधिमंडळात एकमुखी ठराव मंजूर झाले आहेत. विरोधकांनी अनेकदा निदर्शने केली, मोर्चे काढले, बंद पुकारले, परंतु केंद्र सरकारने या प्रश्नी लक्ष घातले नाही. शेवटी महाराष्ट्राच्या नेतृत्वाने आणि महाराष्ट्र एकीकरण समितीने सर्वोच्च न्यायालयात हा विषय नेला आहे.

दुर्दैव असे आहे की हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतानाही कर्नाटक सरकारने बेळगांव ही कर्नाटकची उपराजधानी जाहीर केली. कन्नड भाषेची सक्ती वाढविली. मुद्दाम जाणुनबूजून बेळगांवमध्ये विधिमंडळाचे अधिवेशन भरविण्याचे ठरविले. मराठी भाषिकांनी या गोष्टीच्या निषेधार्थ महामेळावा घेण्याचे ठरविले असता त्यांच्यावर लाठीहल्ला करण्यात आला. नेत्यांची धरपकड केली. शेवटी शिवसेनेच्या वतीने राष्ट्रपती आणि केंद्रीय गृहमंत्री यांच्याकडे शिष्टमंडळ नेऊन जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येत नाही तोपर्यंत सीमाभाग केंद्रशासीत करण्याची मागणी करण्यात आली. या मागणीवर शिवसेना ठाम असून त्यासाठी शिवसेनेचे खासदार वचनबध्द असतील.

## ८. उद्ध्वस्त गिरणी कामगार-कर्मचाऱ्यांना निवारा मिळून त्यांचे संपूर्ण पुनर्वसन झालेच पाहिजे.

१९८१ ते २००६ या २५ वर्षात कापडगिरणी मालक, मालकधार्जिणा राष्ट्रीय मिल मजदूर संघ व काँग्रेस पक्षाची धोरणे याचा एकत्रित परिणाम म्हणजे मुंबईमधील ६२ गिरण्यांतील अडीच लाख गिरणी कामगार उद्ध्वस्त झालेले आहेत.

काँग्रेस शासनाने प्रथम मुंबई विकास नियमावलीमध्ये नियम ५८ घुसडला व त्यानंतर त्यामध्ये आमुलाग्र बदल केला, ज्यामुळे गिरणीमालकांना गिरण्यांची जमीन विकण्यास पूर्णपणे सूट मिळाली.

२००१ ते २००६ ह्या सहा वर्षात मुंबईतील कापड गिरण्या बंद झाल्या, गिरण्यांच्या जागेवर धनदांडग्यांचे प्रचंड मॉल्स उभे राहिले पण एकाही कामगाराला घर किंवा नोकरी मिळाली नाही ही वस्तुस्थिती आहे.

शिवसेना मुंबईतील गिरणी कामगारांना न्याय मिळावा म्हणून वचनबद्ध आहे. पुढील काळात गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळावीत व त्यांचे पुनर्वसन व्यवस्थित व्हावे म्हणून शिवसेनेचे खासदार निकराचे प्रयत्न करतील.

## ९. न्यायालयातील प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा डोंगर

बेजबाबदार, बेपर्वा सरकार लोकांना न्याय देत नाही. स्मॉल कॉजेस कोर्ट, जिल्हा न्यायालय, हायकोर्ट, सुप्रिम कोर्ट अशा फेऱ्या मारुन तक्रारदार थकून जातात. वकीलांवरती कोट्यावधी रुपयांचा खर्च होतो पण न्यायादानाचा विलंब टळत नाही. आजमितीला सुप्रिम कोर्टात ४६ हजार केसेस पडून आहेत. असे म्हणतात की 'Justice delayed is justice denied' म्हणूनच नव्याने निवडून येणारे शिवसेना खासदार न्यायालयाच्या प्रशासकीय मागण्या ताबडतोब मान्य करणे, नवीन न्यायमूर्तींच्या नेमणूका करणे आणि लोकांना त्वरित न्याय मिळवून देण्यास मदत व्हावी म्हणून निकराचा प्रयत्न करतील.

## १०. महागाईवर नियंत्रण

महागाई कोणालाच नको असते परंतु गोरगरीबांना महागाईचा खरा चटका बसतो. मा. श्री. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली जोपर्यंत एन.डी.ए.चे सरकार होते तोपर्यंत देशात बिलकूल महागाई वाढली नाही आणि महाराष्ट्रात शिवशाहीचे सरकार होते त्या पाच वर्षांत एकाही जीवनावश्यक वस्तूचे भाव सरकारने वाढवू दिले नाहीत. पण गेल्या पाच वर्षांत केंद्रात काँग्रेसप्रणीत सरकारने वाढणाऱ्या

महागाईवर नियंत्रण आणलेच नाही. मोठमोठी अर्थविषयक भाषणे केली, सामान्य माणसाला (आम आदमी) नवनवीन स्वप्ने दाखवली. अन्न, पाणी, वस्त्र सर्वच दुर्मीळ झाल्यामुळे आता गोरगरीबच काँग्रेसच्या विरुध्द ठाम उभा राहिला आहे. महागाई रोखण्यासाठी आपल्या प्रत्येक मताची नितांत आवश्यकता आहे. महागाईचा भस्मासूर गाडण्यासाठी काँग्रेसला गाडणे हा एकमेव उपाय आहे.

११. <u>याखेरीज पुढील महत्वाच्या प्रश्नांना शिवसेनेचे खासदार वाचा फोडून जनतेला न्याय मिळवून देतील.</u>

- सर्व गावांना शुद्ध व आवश्यक तितके पाणी पुरविण्यासाठी केंद्राकडून वाढीव निधी मिळविणे.
- राज्यातील सिंचन लाभ प्रकल्पांसाठी केंद्रिय अर्थ सहाय्य उपलब्ध करणे.
- पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचनेसंदर्भातील मर्यादा स्थानिक रहिवाशांच्या हितरक्षणासाठी शिथील करुन घेणे.
- महानगरे, मध्यम व लहान शहरांच्या पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमासाठी आवश्यक तितक्या निधीची तरतूद करणे.
- मुंबईतील छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्थानकाचा विस्तार व आधुनिकीकरण करणे.
- राज्यातील विविध रेल्वे प्रकल्पांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करणे.
- मुंबई हे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून उभारणी करणे.
- कोकण व उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे स्थापन करणे.
- निर्मल भारत योजनेतून प्रत्येक कुंटुंबासाठी शौचालय उभारणे.
- राष्ट्रीय किनारा सुरक्षा योजना स्थानिक जनतेला सहाय्यभूत अशी बनविणे.

**देशासमोर असे असंख्य प्रश्न भेसूर रुप घेऊन उभे आहेत. या आणि इतर प्रश्नांवर प्रामाणिकपणे व निकराने काम करण्यासाठी शिवसेनेचे ज्यास्तीत ज्यास्त खासदार लोकसभेवर निवडून पाठविणे हे मतदारांच्या हिताचे ठरेल. देशाला आजच्या नाजूक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी महाराष्ट्रातील जनता शिवसेनेला प्रचंड शक्ति देईल असा विश्वास वाटतो !**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !**